अतिरिक्त महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका
जावक क्र. :- अतिमआ(ज.)/साप्रवि/आस्था/ ३३०८
दिनांक :- १५/०६/२०२१

## -: आदेश :-

विषय :- आरोग्य विभागाकडील कामकाज व्यवस्थेबाबत.
संदर्भ :- १) आदेश जा.क्र. मआ/साप्रवि/आस्था/२०८८, दि. ०१/०७/२०२०.
२) मा. महापालिका आयुक्त यांचा ठराव क्र.१/८३, दि.१४/०६/२०२१.

आरोग्य विभागाकडील सहाय्यक आरोग्य अधिकारी व पशु वैद्यकीय अधिकारी यांच्याकडील कामकाजाचे वरील संदर्भान्वये वाटप करण्यात आले आहे. त्यामध्ये आता खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

डॉ. श्रीमती अंजली साबणे, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आलेले कामकाजापैकी क्षेत्रिय स्तरावरील आस्थापना व डॉ. वैशाली जाधव, सहाय्यक आरोग्य अधिकारी यांचेकडे सोपविण्यात आलेले कामकाजापैकी आरोग्य विभागातील सामान्य प्रशासन या विभागाचा कार्यभार आरोग्य विभागाकडील डॉ. श्री. प्रल्हाद पाटील, मेडिकल अ‍ॅडमिनीस्ट्रेटीव्ह ऑफिसर यांचेकडे कामकाजाच्या सोयीसाठी वर्ग करण्यात येत आहे.

सदर आदेशाच्या दिनांकापासून डॉ. श्री. प्रल्हाद पाटील, मेडिकल अ‍ॅडमिनीस्ट्रेटीव्ह ऑफिसर यांनी क्षेत्रिय स्तरावरील आस्थापना व आरोग्य विभागातील सामान्य प्रशासन या विभागाचे कामकाज पहावयाचे आहे.

तरी संबंधितांनी वर नमूद कामकाज डॉ. श्री. आशिष भारती, आरोग्य अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली करावयाचे आहे.

संदर्भाधीन आदेशात या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही सुधारणा नाहीत.

(रुबल अग्रवाल)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.)
पुणे महानगरपालिका

प्रत :-

१) मा. महापालिका आयुक्त
यांजकडेस माहितीस्तव सादर...

२) आरोग्य अधिकारी,

३) सहाय्यक आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका
यांजकडेस पुढील तजविजीसाठी रवाना...